# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. संतोष परचुरे
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०२१–२२/१८४ **विशेष मुदत वाढ** दिनांक : ०९/०२/२०२२.

प्रति,
**मा. प्राचार्य/ मा. संचालक**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : **निर्भय कन्या अभियान प्रस्ताव ऑनलाईन पाठविण्यास विशेष मुदत वाढ.**
संदर्भ : या विभागाचे संदर्भ क्र. विविमं/२०२१–२२/१७३, दिनांक २८/०१/२०२२.

महोदय/महोदया,

१. उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून विद्यार्थी विकास मंडळाच्या निर्भय कन्या अभियान योजनेचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात आले होते. त्यानुसार या विभागाच्या वरील संदर्भीय पत्रान्वये निर्भय कन्या अभियान प्रस्तावांस विशेष मान्यता देण्यात आलेली असून विद्यापीठ कार्यक्षेत्रात सदर अभियान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व आयोजक महाविद्यालय/परिसंस्थांच्या संयुक्त विद्यमाने स्वतंत्ररित्या व मोठया प्रमाणावर राबविले जात आहे. त्याअनुषंगाने पूर्वी प्रस्ताव सादर न केलेल्या अथवा या विषयाचे प्रस्ताव विहित पद्धती ऐवजी योजना व उपक्रमांच्या माध्यमातून सादर केलेल्यापैकी अनेक महाविद्यालय/परिसंस्थांनी सदर अभियान राबविण्याची मागणी या विभागाकडे केलेली आहे. अशा सर्व इच्छुक महाविद्यालय/परिसंस्थांच्या मागणीनुसार निर्भय कन्या अभियानाचे प्रस्ताव वरील संदर्भीय पत्राच्या अधिन राहून ऑनलाईन पद्धतीने विशेष बाब म्हणून मागविण्यात येत आहेत.

२. विहित पद्धतीने यापूर्वी निर्भय कन्या अभियान योजनेचे प्रस्ताव सदर केलेल्या महाविद्यालय/परिसंस्थांनी नव्याने सादर करून नयेत. वरील परिच्छेद १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे उर्वरित महाविद्यालय/परिसंस्थांनी या योजनेचे प्रस्ताव विहित ऑनलाईन पद्धतीने व योग्य लिंकद्वारे **शनिवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२२ पर्यंतच सादर करावेत जेणेकरून या विभागामार्फत त्यावर योग्य ती कार्यवाही करणे सुकर होईल.**

३ वरील संदर्भीय पत्र स्वयंस्पष्ट असून त्यानुसार त्यापूर्वी निर्भय कन्या अभियानाचे विहित पद्धतीने प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव मान्य असून आयोजनासाठी त्याअंतर्गत **व्याख्यान** (अधिकतम अनुदान रू. ३,०००/–) अथवा **व्याख्यानासह प्रशिक्षण** (अधिकतम अनुदान रू. ५,०००/–) यापैकी **एकाच उपक्रमाचे** आयोजन अनुज्ञेय असून प्रस्तुत पत्राला देखील त्यात नमूद सर्व बाबी लागू आहेत, याची नोंद घ्यावी.

आपण संबंधित विभागांना/शिक्षकांना **शनिवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२२ या विशेष वाढीव मुदतीत आवश्यकतेनुसार वरीलप्रमाणे निर्भय कन्या अभियानाचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत** अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.
सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक, विद्यार्थी विकास मंडळ


**ऑनलाईनबाबत अधिक माहिती व मदतीसाठी : ०२०–७१५३३६३३**
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०/८१**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. संतोष परचुरे
संचालक

**संदर्भ क्र. विविमं / २०२१-२२ / १७३** **दि. २८/०१/२०२२**

प्रति,
**माननीय प्राचार्य / संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली
विद्यार्थी विकास मंडळाची **निर्भय कन्या अभियान** योजना राबविणारी सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय- 'निर्भय कन्या अभियान योजना' विशेष मान्यतेबाबत .**

महोदय / महोदया

आपल्या प्रस्तावास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षासाठी निर्भय कन्या अभियान योजना राबविण्याबाबत विद्यापीठाकडे आपण पाठवलेला प्रस्ताव विशेष बाब म्हणून मान्य करण्यात येत आहे. त्यानुसार या योजनेत समाविष्ट होणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयाने स्वतंत्रपणे ही योजना राबवावी. महाविद्यालयातील तसेच समाजातील सर्व वयोगट, प्रवाह, स्तर, यातील महिलांना केंद्रस्थानी ठेऊन उपक्रमाचे आयोजन करावे. ही योजना आपल्या महाविद्यालयात स्वतंत्रपणे राबविताना आपल्या महाविद्यालयामधील जास्तीत जास्त विद्यार्थिनींना या योजनेत समाविष्ट करावे. अपवादात्मक स्थितीत आपल्या महाविद्यालयातून ५० पेक्षा कमी विद्यार्थिनी या योजनेत सहभागी होत असल्यास अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी आयोजनापुर्वी संचालक, विद्यार्थी विकास मंडळ तसेच संबंधित जिल्हा समन्वयक यांचेशी विचारविनिमय करून योजनेची रूपरेषा निश्चित करावी. योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान मार्गदर्शिकेत नमूद नसलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी झालेल्या कार्यवाहीचा विचार केला जाणार नाही. (या योजनेत आपल्या महाविद्यालयांमधीलच जास्तीत जास्त विद्यार्थिनींना समाविष्ट करावे तथापि आवश्यकतेनुसार अन्य स्थानिक महिलांनादेखील आमंत्रित करता येऊ शकेल.)

सदर योजना राबविताना; महिला सबलीकरण, महिलांचा व्यक्तिमत्व विकास, स्त्रियांची प्रेरणास्थाने , स्त्रियांचे स्वास्थ्य, महिला उद्यमशीलता, स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांसाठी समान संधी, लिंगभाव जागृती – सहसंवाद - सहवेदना, विवाहपूर्व समुपदेशन, महिलांचा सामाजिक व कौटुंबिक सुसंवाद. विद्यार्थिनी-पालक-शिक्षक परस्पर सहसंवाद, महिलांची परिस्थितीजन्य निर्णयक्षमता **तसेच** स्त्री हक्क-अधिकार- विषयक नियम - संहिता - कायदे.स्त्रियांचे घटनादत्त आणि संवैधानिक अधिकार, स्त्रियांविरुद्ध अयोग्य वर्तन, अन्याय, कुठल्याही प्रकारची हिंसा, मानसिक, शारीरिक, सामाजिक इत्यादी स्वरूपाचा आघात, अनुचित शेरेबाजी, अनुचित मागणी, अनुचित विनंती, तसेच इतर कोणत्याही प्रकारची शारीरिक, शाब्दिक, अशाब्दिक स्वरुपाची अस्वागतार्ह अथवा अस्विकारार्ह वागणूक तसेच स्त्रियांच्या आत्मसन्मानाला बाधा पोचेल अशा कोणत्याही स्वरूपाच्या वर्तनापासून अथवा अनुभवापासून संरक्षण आणि यांचा प्रतिकार व प्रतिबंध इत्यादी बिंदूंवर आधारित विषयाच्या स्वरूपानुसार व्याखान आणि / अथवा प्रशिक्षण सत्र - शिबीर आयोजित करावे. याकरिता नजीकच्या परिसरातून प्राधान्याने शक्यतो महिला पोलीस अधिकारी, विधिज्ञ, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, प्रशिक्षित अथवा व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ता, मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक, पत्रकार यासारख्या तज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रित करावे. या माध्यमातून विद्यार्थिनींना बौद्धिक, शारीरिक, मानसिक, भावनिक इत्यादी स्तरावर सक्षम बनविण्याच्या दृष्टीने हि योजना राबवावी. **सदर उपक्रमाचे आयोजन माहे २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंतच करणे अनिवार्य असून सदर योजना राबविण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाकडून खालील प्रमाणे अर्थसाहाय्य करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**

| १. प्रत्यक्ष / ऑनलाईन व्याख्यान **(अधिकतम रुपये ३,००० पर्यंत )** | | | | २. व्याख्यान तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण अशा दोन्ही उपक्रमाचे आयोजन **(अधिकतम रुपये ५,००० पर्यंत )** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.१ | प्रती तज्ञ व्यक्ती मानधन रुपये १,०००/- (यांप्रमाणे जास्तीत-जास्त ३ व्याख्याने ) | : | रुपये ३,०००/- | २.१ | प्रती तज्ञ व्यक्ती मानधन रुपये १,०००/- (यांप्रमाणे जास्तीत-जास्त २ व्याख्याने) | : | रुपये २,०००/- |
| | | | | २.२ | स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण | : | रुपये २,०००/- |
| | | | | २.३ | आयोजन खर्च | : | रुपये १,०००/- |
| | **एकूण** | : | रुपये ३,०००/- | | **एकूण** | : | रुपये ५,०००/- |

**१. शासन व स्थानिक प्रशासनाच्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक सर्व नियम व निर्बंधांच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी करावी.**
**२. शासन निर्देशानुसार संपूर्ण लसीकरण झालेले असल्याची खात्री करून घेऊनच इच्छुक विद्यार्थिनींना या योजनेत समाविष्ट करावे.**
**३. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्थानिक प्रशासन, आरोग्य विभाग, संस्था प्रशासन, महाविद्यालय प्रशासन इत्यादी यंत्रणांकडून आवश्यकतेनुसार योग्य ती परवानगी प्राप्त करून घेण्यासंबंधी आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.**
**४. विद्यार्थिनींकडून कोविड अनुरूप वर्तन व समूहशिस्त यांचे काटेकोरपणे पालनसुनिश्चित करण्यासाठी आपल्या स्तरावर विद्यार्थिनी अथवा / तसेच पालक यांची समूह सहभागासाठी संमती अथवा हमी आवश्यकतेनुसार प्राप्त करून घ्यावी.**
**५. कोविडच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची, संपूर्ण सुरक्षेची सर्वस्वी जबाबदारी ही सबंधित महाविद्यालय/ परिसंस्थेचीच आहे; याची नोंद घ्यावी.**
**६. कोविड अनुरूप वर्तन आणि कोविड प्रतिबंधात्मक नियम व निर्बंधांचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिकृत यंत्रणांकडून होणाऱ्या कायदेशीर प्रशासकीय/दंडात्मक इत्यादी स्वरूपाच्या संभाव्य कार्यवाहीस सबंधित महाविद्यालय/परिसंस्था संपूर्णपणे जबाबदार असून याबाबत विद्यापीठाचे कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/आर्थिक उत्तरदायित्व असणार नाही.**
**७. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींच्या लसीकरणाची माहिती या विभागाच्या पत्र क्रमांक विविमं/२०२१-२२/०३४, दिनांक २८/१०/२०२१ नुसार भरणे अनिवार्य आहे.(संबंधित पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थी विकास मंडळाच्या परिपत्रकात उपलब्ध आहे.)**
**८. शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक आदेशाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी, कार्यान्वयन, स्थगिती अथवा समाप्ती करणे बंधनकारक असून याबाबत महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या स्तरावर योग्य ते निर्णय घ्यावेत.**

**याचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. सदर योजना आपल्या महाविद्यालयात माहे २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत राबविणे अनुज्ञेय आहे.**

**(डॉ.संतोष परचुरे)**
**संचालक**
**विद्यार्थी विकास मंडळ**